दाखल तारीख : ०५ ०५ २०१७
नोंदणी तारीख : ०५ ०५ २०१७
निकाल तारीख : ३१ ०३ २०२६
कालावधी : व म दि
०८ १० २६

**न्यायदंडाधिकारी वर्ग –१ देवगड, तालुका देवगड, जिल्हा सिंधुदूर्ग**

(पिठासीन अधिकारी श्रीकांत एस. पचंडी )

**इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१०/२०१७**
**निशाणी क्र. – ६०**

**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–०००१८५–२०१७**

प्रिया तेजस डांगे
विवाहापुर्वीची
प्रिया महादेव करंदीकर
वय २८ वर्षे, धंदा – काही नाही
रा. मु.पो. पोयरे, गावठाणवाडी
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग **... अर्जदार**

**विरुध्द**

१] तेजस विठोबा डांगे
वय ३० वर्षे, धंदाः नोकरी

२] गिता विठोबा डांगे
वय ५८ वर्षे, धंदाः गृहिणी

दोन्ही रा. खोली नं.२, हनुमान गल्ली नं.७,
भगतसिंग नगर नं.१, न्यू लिंक रोड,
गोरेगाव वेस्ट, मुंबई – ४००१०४. **.... सामनेवाले**

---

अर्जदार तर्फे विधिज्ञ – श्री.आर.एस.राणे
सामनेवाला तर्फे विधिज्ञ – श्री.के.के.मराठे

---

## <u>न्यायनिर्णय</u>

(दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी जाहीर केला)

प्रस्तुत अर्ज हा अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ मधील कलम १२ अन्वये दाखल केला आहे. अर्जदार हिने आपल्या अर्जामध्ये प्रस्तुत कायद्यातील विविध तरतुदी अंतर्गत संरक्षणात्मक आदेश, निवासी आदेश, आर्थिक सहाय्य, नुकसान भरपाई इत्यादी ची मागणी केली आहे.

### <u>अर्जदार यांनी विषद केलेली हकीकत थोडक्यात खालील प्रमाणे -</u>

०२. अर्जदार हिच्या कथना नुसार अर्जदार व सामनेवाला हे नात्याने पती पत्नी असून त्यांचा विवाह दि.०१/०३/२०११ रोजी विलेपार्ले येथील साई मंदिर मध्ये पार पडला आहे.

०३. अर्जदार हिच्या कथना नुसार सामनेवाला हा अर्जदार हिच्यावर संशय घेऊन तिला वारंवार शिवीगाळ व मारहाण करत असे. अर्जदार गरोदर असताना सामनेवाला याने तिच्या पोटावर मारहाण केली. त्यामुळे अर्जदार हिचा तीन वेळा गर्भपात झाला. तसेच तिच्या कानात तेल टाकून तिला मारहाण केल्याने तिच्या कानाला कायमची इजा झाली असून तिला ऐकण्यास कमी येते. अर्जदार हिला सामनेवाला याच्या पासून दोन जुळया मुली असून त्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी ही अर्जदार हिच्यावर आहे. सामनेवाला याच्या छळाला कंटाळून अर्जदार हिने गोरेगाव, एम.जी.रोड पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली व तेव्हा पासून ती आपल्या गावी राहत आहे.

०४. अर्जदार हिच्या कथना नुसार सामनेवाला हा एका नामांकित कंपनीत कामाला असून त्याला प्रतिमहा रु.१५,०००/- इतका पगार आहे. अर्जदार व तिच्या मुली यांच्या पालनपोषणाची जबाबदारी ही सामनेवाला याच्यावर असून देखील तो आपली जबाबदारी टाळत असतो. त्यामुळे अर्जदार हिने अशी विनंती केली आहे की, प्रस्तुत अर्ज मंजूर करुन अर्जात केलेल्या मागण्या मंजूर कराव्यात अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

०५. प्रस्तुत प्रकरणी सामनेवाला क्र.१ व २ यांस नोटीसची बजावणी झाल्या नंतर त्यांनी हजर होऊन नि.क्र.११ येथे आपले म्हणणे दाखल केले आहे. सामनेवाला याने अर्जदार हिच्या अर्जातील कथने स्पष्टपणे नाकारली आहेत. परंतु सामनेवाला यांनी अर्जदार ही त्याची पत्नी असून त्यांना दोन जुळया मुली असल्याचे मान्य केले आहे.

०६. सामनेवाला क्र.१ व २ यांनी आपल्या म्हणण्या मध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार हिचे तौफिक खान नामक व्यक्तीशी अनैतिक संबंध आहेत. अर्जदार हिने सामनेवाला याच्या विरोधात पोलीस स्टेशन येथे खोटया तक्रारी दाखल केल्या आहेत. तसेच कोणतेही कारण घडलेले नसताना सामनेवाला याचा त्याग करुन अर्जदार ही निघून गेली आहे. अर्जदार हिने नांदण्यास यावे या करिता सामनेवाला याने बरेच प्रयत्न केले. परंतु अर्जदार हिने त्यास कोणताही सकारात्मक प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे वरील सर्व परिस्थीतीचा विचार करता प्रस्तुत अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

०७. अर्जदार हिने तिच्या कथनांच्या पुष्ठयर्थ स्वतःचे सरतपासाचे शपथपत्र नि.क्र.३८ येथे सादर केले आहे. अर्जदार हिने नि.क्र.४४ येथे पुरशीस दाखल करुन आपला पुरावा बंद केला आहे.

०८. सामनेवाला क्र.१ तेजस विठोबा डांगे यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्ठयर्थ स्वतःचे सरतपासाचे शपथपत्र नि.क्र.५५ येथे सादर केले आहे. सामनेवाला क्र.१ यांनी नि.क्र.५९ येथे पुरशीस दाखल करुन आपला पुरावा बंद केला आहे.

०९. अर्जदार तर्फे वकील श्री.आर.एस.राणे यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी अर्जातील कथना प्रमाणे युक्तीवाद करुन प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची विनंती केली. तसेच सामनेवाला तर्फे वकील श्री.के.के.मराठे यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी अर्जदार हिच्या विरोधात कोणताही हिंसाचार झाला असल्याचे सकृत दर्शनी शाबीत होत नसल्याने प्रस्तुत अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

१०. अर्जदार हिच्या अर्जातील कथने त्यास सामनेवाला यांनी दाखल केलेले म्हणणे तसेच अर्जदार यांनी अभिलेखावर दाखल केलेला पुरावा व अर्जदार तर्फे वकील व सामनेवाला तर्फे वकील यांनी केलेला युक्तीवाद यांचे अवलोकन केले असता खालील प्रश्न माझ्या अवलोकनार्थ उपस्थित झाले. त्यांचे निम्नलिखीत कारणमिमांसेवर आधारीत उत्तरे अभिलिखीत करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सामनेवाला क्र.१ व २ यांनी अर्जदार हिचेवर कौटुंबिक हिंसाचार केला आहे हे अर्जदार सिध्द करते का? | अंशत: होकारार्थी |
| २. | अर्जदार तिच्या मागणी प्रमाणे संरक्षण आदेश मिळणेस पात्र आहे का? | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ३. | अर्जदार मागणी करते त्या प्रमाणे निवारा आदेश मिळणेस पात्र आहे का? | होकारार्थी |
| ४. | अर्जदार मागणी करते त्या प्रमाणे रक्कम रु.१,३०,०००/- नुकसान भरपाई मिळणेस पात्र आहे का? | अंशत: होकारार्थी |
| ५. | अर्जदार मागणी करते त्या प्रमाणे रु. ७,०००/- दरमहा आर्थिक मदत मिळणेस पात्र आहे का? | अंशत: होकारार्थी |
| ६. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>प्रश्न क्र.१ करीता</u>** –

११. अर्जदार हिने आपल्या कथनांच्या पुष्टयर्थ <u>नि.क्र.३८</u> येथे आपले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जदार हिने आपल्या सरतपासामध्ये आपल्या अर्जातील कथनांचा पुर्नउल्लेख केला आहे. सामनेवाला तर्फे वकील श्री.के.के.मराठे यांनी अर्जदार हिचा उलटतपास घेतला. उलटतपासामध्ये अर्जदार हिने गर्भपाताबाबत व कान फुटल्याच्या घटनेबाबत उपचार कोणत्या डॉक्टरकडे घेतले हे माहीत असून त्याबाबतचे कागदपत्रे न्यायालयात दाखल करणे शक्य असल्याचे कथन केले आहे. परंतु तसा कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदार हिने प्रस्तुत प्रकरणी अभिलेखावर हजर केलेला नाही. त्यामुळे केवळ अर्जदार हिला सामनेवाला याने मारहाण केल्यामुळे तिचा गर्भपात झाला व तिला बहिरेपणा आला हे दर्शविण्याकरिता अर्जदार हिच्या शब्दांव्यतिरीक्त अन्य कोणताही पुरावा

अभिलेखावर दाखल असल्याचे दिसून येत नाही. अर्जदार हिच्या कथना नुसार सामनेवाला याने अर्जदार हिला तिच्या भावासमोर शिवीगाळ व मारहाण केली होती. परंतु अर्जदार हिने प्रस्तुत प्रकरणी आपल्या भावास तपासलेले नाही. घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायद्या नुसार पिडीत महिलेने दाखल केलेले शपथपत्र हा प्राथमिक पुरावा मानला जातो. मात्र अर्जदार हिने तिच्या उलटतपासामध्ये मान्य केलेल्या बाबी तसेच अर्जदार हिने केलेल्या आरोपांचे गांभीर्य लक्षात घेता केवळ अर्जदार हिच्या तोंडी पुराव्यावर विसंबून राहून अर्जदार हिच्याबाबत सामनेवाला याने कोणताही शारीरिक हिंसाचार केला आहे याबाबत कोणत्याही निष्कर्षाप्रत येणे न्यायोचित वाटत नाही. तसेच अर्जदार हिच्या कथना नुसार सामनेवाला क्र.२ हिने सामनेवाला क्र.१ यास मारहाणीत साथ दिली असल्याचे कथन केले आहे. परंतु त्याबाबतचा देखील कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे सामनेवाला क्र.२ हिने अर्जदार हिच्याबाबत हिंसाचार केला ही बाब सकृत दर्शनी शाबीत होऊ शकलेली नाही.

१२. परंतु अर्जदार हिने तिच्या अर्जामध्ये सामनेवाला क्र.१ याने तिच्या सोबत तिच्या इच्छे विरोधात व जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवल्याचे कथन केले आहे. प्रस्तुत बाब जरी सामनेवाला याने आपल्या म्हणण्यामध्ये नाकारली असली तरी अर्जदार हिच्या उलटतपासामध्ये त्याबाबत कोणताही प्रश्न विचारल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अर्जदार हिच्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामधील कथने अबाधित राहिल्याचे दिसून येते. सामनेवाला क्र.१ याची कृती ही निश्चीतच महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम कलम ३ अंतर्गत लैंगिक अत्याचार (sexual abuse) होत असल्याने सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिच्या बाबत घरगुती हिंसाचार (Domestic Violence) केल्याचे सकृत दर्शनी दिसून येते. त्यामुळे मी प्रश्न क.१ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>प्रश्न क्र.२ करिता</u> –**

१३. अर्जदार हिने आपल्या अर्जात सामनेवाला याच्या विरोधात संरक्षण आदेशाची मागणी केली आहे. सामनेवाला याची आजपर्यंतची कृती पाहिली असता, तसेच अर्जदार व सामनेवाला यांचे संबंध लक्षात घेता, भविष्यात देखील सामनेवाला हा अर्जदार हिच्या बाबत हिंसक कृत्य करण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थीतीत अर्जदार हिच्या बाबत सामनेवाला याने कोणतेही हिंसक कृत्य करू नये या करिता महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम कलम १८ अन्वये संरक्षणात्मक आदेश पारित करणे आवश्यक वाटते. त्यामुळे मी <u>प्रश्न क्र.२</u> चे उत्तर <u>होकारार्थी</u> नोंदवत आहे.

**<u>प्रश्न क्र.३ करिता</u> –**

१४. अर्जदार हिने सामनेवाला याने त्यांच्या निवाऱ्याची सोय करावी अशी मागणी केली आहे. अर्जदार हिच्या अर्जातील कथना नुसार ती दि.२१/०३/२०१७ पासून आपल्या गावी राहत असल्याचे कथन केले आहे. सामनेवाला याने देखील आपल्या उलटतपासामध्ये हे मान्य केले आहे की, सन २०१७ पासून त्याने त्याच्या मुलींची व अर्जदार हिच्या निवाऱ्याची सोय केलेली नाही. याचाच अर्थ असा की, अर्जदार ही सद्य स्थितीत सामनेवाला याच्या सोबत राहत नाहीत. अर्जदार हिने सामनेवाला याच्या सोबत न राहण्याची दिलेली कारणे संयुक्तीक वाटतात. त्यामुळे अर्जदार हीने कोणतेही कारण नसताना सामनेवाला याचा त्याग केला आहे असे दिसून येत नाही. अर्जदार ही सामनेवाला याची पत्नी असून तिच्यावर तिच्या दोन मुलींची जबाबदारी आहे. त्यामुळे अर्जदार हिच्या निवासाची व्यवस्था करणे ही सामनेवाला याची नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम कलम १९ अन्वये अर्जदार

ही निश्चीतच निवारा आदेश मिळणेस पात्र आहे. त्यामुळे मी प्रश्न क्र.३ चे उत्तर होकारार्थी नोंदवत आहे. त्याबाबत अंतिम आदेशामध्ये निर्देश देण्यात येतील.

**प्रश्न क्र.४ करिता –**

१५. अर्जदार हीने तिच्या बाबत झालेल्या हिंसाचाराची नुकसान भरपाई म्हणून सामनेवाला याने एकूण रक्कम रु.१,३०,०००/– देण्याची मागणी केली आहे. अर्जदार हिच्या अर्जातील कथने तसेच अर्जदार हिने दाखल केलेले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले असता निश्चीतच अर्जदार ही सामनेवाला यांच्या हिंसाचारास बळी पडल्याचे शाबीत होते. त्यामुळे अर्जदार ही निश्चीतच सामनेवाला याच्याकडून नुकसान भरपाई मिळणेस पात्र आहे. अर्जदार हिने जरी रक्कम रु.१,३०,०००/– नुकसान भरपाईची मागणी केली असली तरी अर्जदार हिच्या अर्जातील कथनांचा विचार करता अर्जदार हिस रक्कम रु.५०,०००/– नुकसान भरपाई मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे मी प्रश्न क्र.४ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदवत आहे.

**प्रश्न क्र.५ करिता –**

१६. अर्जदार हिच्या कथना नुसार तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. याउलट, सामनेवाला हा मुंबई येथे चांगल्या कंपनीत कामाला असून त्याला दरमहा रु.१५,०००/– एवढा पगार आहे. सदर बाब सामनेवाला याने आपल्या उलटतपासामध्ये नाकारलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी अर्जदार व सामनेवाला यांनी आपले मालमत्ता, खर्च व दायित्वचे प्रमाणपत्र हजर केले नाही. परंतु प्रस्तुत प्रकरण हे आठ वर्ष जुने असून प्रस्तुत प्रकरणात अर्जदार व सामनेवाला यांचा पुरावा देखील नोंदविण्यात आला आहे. प्रस्तुत पुराव्या वरुन अर्जदार व

सामनेवाला यांची मिळकत व खर्च याबाबत निर्णय घेता येणे शक्य आहे. पोटगीची रक्कम ठरविताना अर्जदार हिचे रहाणीमान व मुलांचे शिक्षण या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. सामनेवाला याने आपल्या उलटतपासात मान्य केले आहे की, त्याच्या मुली या अर्जदार हिच्याकडे असून अर्जदार ही त्याचा सर्व खर्च करते. तसेच अर्जदार हिचे कोणतेही शिक्षण झालेले नाही. सामनेवाला याने आपल्या उलटतपासामध्ये तो एम.जी.एम रोड येथील सिंगनेट कंपनीत कामाला असल्याचे मान्य केले आहे. यावरुन सामनेवाला याला उत्पन्नाचे साधन असल्याचे स्पष्ट होते. सामनेवाला हा अर्जदार हिचा पती असून अर्जदार हिच्या सोबत राहणाऱ्या दोन मुलींचा वडील देखील आहे. त्यामुळे त्यांच्या पालनपोषणाची नैतिक जबाबदारी सामनेवाला याच्यावर आहे. जरी अर्जदार हिने दरमहा रक्कम रु.७,०००/- पोटगीची मागणी केली असली तरी सामनेवाला याचे उत्पन्न, तसेच अर्जदार यांच्या गरजा यांचा विचार केला असता अर्जदार हीस प्रतिमहा रक्कम रु.३,०००/- आर्थिक सहाय्य तसेच रक्कम रु.२,०००/- निवासाच्या सोयी करिता प्रतिमहा अर्ज दाखल तारखे पासून देण्याबाबत आदेश करणे न्यायोचित वाटते. त्यामुळे मी प्रश्न क्र.५ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदवत आहे.

**प्रश्न क्र.६ करीता** -

१७. सबब, अर्जदार यांच्या अर्जातील कथने, अर्जदार हिचा तोंडी व कागदोपत्री पुरावा याच्या अवलोकनातून मी प्रश्न क्र.१, ४ व ५ चे उत्तर अंशत: होकारार्थी तसेच प्रश्न क्र.२ व ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवून प्रश्न क्र.६ करिता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिला फोन, चिठ्ठी, निरोप या द्वारे कोणताही त्रास देऊ नये अथवा शिवीगाळ व मारझोड करु नये असा आदेश पारित करण्यात येतो.

३. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिच्या केलेल्या शारीरिक व मानसिक छळापोटी अर्जदार हिस रक्कम रु.५०,०००/- नुकसान भरपाई अदा करावी.

४. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार यांना अर्ज दाखल तारखे पासून दरमहा एकूण रक्कम रु.७,०००/- आर्थिक सहाय्य व निवासी आदेशा करिता अदा करावे.

५. या आदेशाची प्रत अर्जदार यांना मोफत देण्यात यावी.

६. सदर आदेशाची एक प्रत पोलीस निरीक्षक, देवगड व संरक्षण अधिकारी, देवगड यांना पाठविण्यात यावी.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला. )

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI

Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.03.31 17:19:10 +0530

( श्रीकांत एस. पचंडी)

दिनांक: ३१/०३/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग - १, देवगड